सकाळ | बीड TODAY
औरंगाबाद, शुक्रवार, १ एप्रिल २०२२
SakalNews @SakalMediaNews www.esakal.com Call Centre : 9225800800

# वटणवाडी येथे रासेयो विद्यार्थ्यांनी केली ग्रामस्वच्छता

आष्टी, ता. ३१ : कडा येथील गांधी महाविद्यालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील वटणवाडी येथे आरोग्य आणि साक्षरतेसाठी युग या संकल्पनेतून सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

याअंतर्गत सहभागी स्वयंसेवकांनी ग्रामस्वच्छता, प्लॅस्टिकमुक्त गाव, विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. ग्रामस्थांना साक्षरतेचे महत्त्व पटवून देत जनजागृती केली. ता. २५ ते ता.३० दरम्यान प्रा. अभय शिंदे, प्रा. युनुस सय्यद, प्रा. योगेश रसाळ, प्रा. राम बोडखे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमासाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. नवनाथ विघाते, प्रा. अनारसे, प्रा. व्ही. टी. वाघुले यांनी पुढाकार घेतला. यावेळी सरपंच जालिंदर नरवडे, ग्रामविकास अधिकारी इस्साद पठाण आदी उपस्थित होते. आज (ता. ३१) या शिबिराचा समारोप होणार आहे.



आष्टी : तालुक्यातील वटणवाडी येथे आयोजित शिबिरात स्वयंसेवकांनी ग्रामस्वच्छता मोहीम राबविली.

झुंजारनेता

दिनांक : २७ मार्च २०२२

# किरण शिनगीरे यांना समाजरत्न पुरस्कार जाहीर



आष्टी, दि.२६ (प्रतिनिधी):- कडा येथील गांधी महाविद्यालयाचे जनरल सेक्रेटरी किरण भगवानराव शिनगीरे यांना राज्यस्तरीय आदर्श युवा महाराष्ट्र युथ आयडॉल समाजरत्न पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष कांतिलालशेठ चानोदिया, विश्वस्त अध्यक्ष गोकुळदास मेहेर, माजी शिक्षणआधिकारी विक्रम पोकळे, झुंजारनेताचे उपसंपादक उत्तम बोडखे, उपप्राचार्य ज.मो.भंडारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डा. नवनाथ विधाते व आदी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित इंजि.पी.बी. बोडखे, ग्रामसेवक विकास पठाण, सहकार्यक्रमाधिकारी अनारसे, तुकाराम गोंदकर, तळेकर, सय्यद, कुलकर्णी मॅडम, देशमुख मॅडम, बॉम्बे मॅडम, टकले मॅडम, हिरालाल लुनावत, मुकुंद बेलेकर, विद्यार्थिनी प्रतिनिधी पल्लवी आंघळे, राष्ट्रीय सेवा योजना प्रतिनिधी प्रितेश भालेकर व आदी विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांचा दि.१५ एप्रिल रोजी नाशिक येथे पुरस्कार प्रदान होणार आहे.

लोकमत
शुक्रवार २५.३.२०२२
हॅलो बीड
epaper.lokmat.com

सूर्यभान राऊत : गांधी महाविद्यालयात गॅस सुरक्षेबाबत मोलाचे सल्ले

# गॅसचा सुरक्षित वापर करून अपघात टाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

आष्टी : तालुक्यातील कडा येथील अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या गांधी महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन विभाग व बारामती येथील गॅस कंपनीच्या संयुक्त विद्यमाने गॅस सुरक्षा अभियानांतर्गत सूर्यभान राऊत यांचे व्याख्यान झाले. तसेच मार्गदर्शन करण्यात आले.

सूर्यभान राऊत म्हणाले की, गॅस रेग्युलेटर वापरताना नेहमी त्यावर दिलेल्या सूचना पाळाव्यात. सिलिंडर खरेदी करताना त्यावरील मुदंत प्रत्येक वेळी तपासावी. गॅस शेगडी पाण्याने न धुता ओल्या कपड्याने पुसून घ्यावी. गॅस शेगडी नेहमी गॅस ओट्यावर असावी. गॅस खाली ठेवून स्वयंपाक करू नये, या मार्गदर्शक सूचना सविस्तर सांगितल्या. तसेच गॅस सिलिंडर वापरताना होणारे संभाव्य धोके कसे टाळता येतील याचे प्रात्यक्षिक दाखवून सखोल मार्गदर्शन त्यांनी केले.



कडा येथील गांधी महाविद्यालयात आपंत्ती व्यवस्थापन विभाग व बारामती येथील गॅस कंपनीच्या संयुक्त विद्यमाने गॅस सुरक्षा अभियान राबवण्यात आले.

आपत्ती व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. मीरा नाथ यांनी प्रास्ताविक केले. त्या म्हणाल्या की, गॅस सिलिंडर प्रंत्येकाच्या जीवनात खूप महत्त्वाचे झाले आहे. ते वापरताना होऊ शकणारे अपघात टाळण्याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

उपप्राचार्य डॉ. जे. एम. भंडारी यांनी अध्यक्षीय समारोप केला. ते म्हणाले, जशा प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात याप्रमाणे गॅस सिलिंडर वापरणे जेवढे सोयीस्कर आहे तितकेच घातकही आहे. परंतु योग्य वापर केला तर आपत्ती टाळता येऊ शकते. गॅसचा वापर करताना सावध असणे फार गरजेचे आहे. तुमचे थोडे दुर्लक्ष अथवा बेफिकीरपणा पूर्ण कुटुंबाचे नुकसान करू शकते. थोडासा सावधपणा आणि सुरक्षा राखली तर तुमचेच नाही देशाचेही रक्षण होईल.

सूत्रसंचालन प्रा. धनश्री मुनोत यांनी केले. डॉ. जमीर सय्यद यांनी उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

दिव्य मराठी
# बीड जिल्हा
बीड. शनिवार, २६ मार्च २०२२

**दिव्य मराठी विशेष** • आष्टीतील रमेशच्या वडिलांचे हेअर सलून, तर विकास व मुकुंदचे आईवडील शेतकरी

# सामान्य कुटुंबातील तीन तरुण झाले फौजदार

राजेश राऊत | कडा

परिस्थिती जरी खडतर असली तरीही अशा परिस्थितीवर मात करत यश मिळू शकते, याचा प्रत्यय आष्टी तालुक्यात आला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने २०१९ मध्ये घेण्यात आलेल्या पोलिस उपनिरीक्षक पदाच्या मुख्य परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला असून आष्टी तालुक्यातील सामान्य शेतकरी कुटुंबातील तिन्ही तरुणांनी खडतर परिस्थितीवर मात करत यशाला गवसणी घातली. यातील रमेश पवळ या तरुणाचे वडील हेअर सलूनच चालवतात. तर विकास भोसले व मुकुंद ढोबळे या दोन्ही तरुणांचे आईवडील शेतकरी आहेत.

मार्च २०१९ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने पोलिस उपनिरीक्षक पदाची मुख्य परीक्षा घेण्यात आली होती. दरम्यानच्या काळात कोरोनाच्या संकटामुळे शारीरिक चाचणी परीक्षा घेण्यात आली नव्हती. मागील वर्षी झालेल्या या परीक्षेचा शुक्रवारी अंतिम निकाल जाहीर करण्यात आला. आष्टी तालुक्यातील सामान्य कुटुंबातील तीन तरुण फौजदार झाले. या परीक्षेत आष्टी तालुक्यातील कडा (ता. आष्टी) येथील मयूर रमेश पवळ या तरुणाने गांधी महाविद्यालयात एमएस्सी (ऑरगॅनिक केमिस्ट्री)चे शिक्षण घेतलेले होते. त्याचे वडील रमेश पवळ हे हेअर सलून चालवतात, तर विकास सोनाजीराव भोसले हा तरुण सांगवी पाटण (ता. आष्टी) गावातील रहिवासी असून त्याचे आईवडील शेतकरी आहेत. विकासने दहावीपर्यंतचे शिक्षण गावात घेतल्यानंतर पुढे बारावीपर्यंतचे शिक्षण कडा येथे तर महाविद्यालयीन शिक्षण पुण्यातील पिंपरी चिंचवड येथील महात्मा फुले महाविद्यालयात घेतले आहे. सूक्ष्म जीवशास्त्र विषयात त्याने पदवी मिळवली आहे, तर तालुक्यातील शेरी खुर्द येथील मुकुंद कल्याण ढोबळे या तरुणाने कडा येथील गांधी महाविद्यालयात बीएस्सीचे शिक्षण घेतलेले असून मुकुंद ढोबळे याचे आईवडील दोघेही शेती करतात. सामान्य कुटुंबातील या तिन्ही तरुणांनी खडतर परिस्थितीवर मात करत यश मिळवले आहे.

## क्लास न लावता स्वयंअध्ययन केले, यशाला घातली गवसणी

आष्टी तालुक्यातील मयूर पवळ आणि विकास भोसले या दोघांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पोलिस उपनिरीक्षक पदाच्या परीक्षेत दोन वेळा प्रयत्न केल्यानंतर त्यांना हे यश मिळाले, तर मुकुंद ढोबळे हे तिसऱ्या प्रयत्नात उत्तीर्ण झाले. विशेष म्हणजे तिघांनीही क्लास न लावता स्वयंअध्ययन करत फौजदार होण्याचे स्वप्न पूर्ण केले.


मुकुंद ढोबळे


मयूर पवळ


विकास भोसले.

लोकमत
मंगळवार १५.३.२०२२
हॅलो बीड



# गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय महिला दिन

## स्त्री - पुरूष समानता विषयावर आरोग्य अधिकाऱ्यांचे व्याख्यान

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**आष्टी :** तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त महिला विभाग, एनएसएस विभाग आणि नॅक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम घेण्यात आला.

उज्ज्वल भविष्यासाठी स्त्री-पुरुष समानता या विषयावर आष्टी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री शिंदे यांचे व्याख्यान घेण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रणरागिनी महिला संघटनेच्या अध्यक्षा डॉ. मीरा नाथ यांनी केले. उपप्राचार्य डॉ. जे. एम. भंडारी यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अरुणा कुलकर्णी यांनी केले. आभार प्रा. धनश्री मुनोत यांनी मानले. याप्रसंगी प्रा. सुनीता बोंबे, डॉ. सुपर्णा देशमुख, एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. नवनाथ विधाते, नॅक समन्वयक डॉ. नरेंद्र गवळी तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जारनेता

LIBRARY

दिनांक : १४ जानेवारी २०२२ वार शुक्रवार पान ३

# गांधी महाविद्यालयात जिजाऊ जयंती व राष्ट्रीय युवा दिन साजरा



२आष्टी दि.१३ (प्रतिनिधी) - श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि इतिहास विभाग व खट्टउ यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती, राष्ट्रीय युवा दिन काल साजरा करण्यात आला.यावेळी डॉ.स्मिता शिंदे, सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालय औरंगाबाद यांचे आभासी पध्दतीने राजमाता जिजाऊ शोध आणि बोध याविषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी हे होते. यावेळी बोलताना डॉ.स्मिता शिंदे म्हणाल्या की राजमाता जिजाऊंचे हिंदवी स्वराज्य स्थापणेत मोठे योगदान आहे. जिजाऊंनी स्वराज्यासाठी दोन छत्रपती दिले त्यांनी यावेळी राजमाता जिजाऊंच्या बालपणापासून ते अस्ता पर्यंत त्यांचे चरित्र उभे करतांना आजच्या प्रत्येक महिलांनी स्वतः जिजाऊ व्हावे व मुलींना जिजाऊ घडवावे असा मोलाचा संदेश दिला.अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी यांनी स्वामी विवेकानंद यांचे जीवन व कार्य याविषयावर विवेचन केले.याप्रसंगी भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ.उध्दव चव्हाण यांनी ४० हजार रुपये किंमतीची पुस्तकेभेट दिली.यावेळी महाविद्यालयचे उपप्राचार्य डॉ.जे.एम.भंडारी हे उपस्थित होते.यावेळी सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आभासी पध्दतीने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन प्रा.डॉ. उध्दव चव्हाण यांनी केले. पाहूण्यांचा परिचय राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.नवनाथ विधाते यांनी व तर आभार डॉ.पांडूरंग अनारसे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.नरेंद्र गवळी व डॉ.राधाकृष्ण जोशी यांनी परिश्रम घेतले.

प्रवाण दवण

लोकमत हॅलो बीड
रविवार ३१.१०.२०२१
epaper.lokmat.com

रासेयो, आपत्ती व्यवस्थापन विभागाचा पुढाकार

# गांधी महाविद्यालयात १३७ जणांचे लसीकरण

लोकमत न्यूज नेटवर्क

आष्टी : श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ कडा संचलित गांधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग,आपत्ती व्यवस्थापन विभाग व आय क्यू ए सी विभागाच्या वतीने मिशन युवा स्वास्थ्य योजनेंतर्गत २८ ऑक्टोबरला कोविड-१९ चे लसीकरण शिबिर घेण्यात आले. या उपक्रमास विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून, १३७ विद्यार्थ्यांनी कोविड प्रतिबंधक लस घेतली.



आष्टी येथील गांधी महाविद्यालयात रासेयो विभाग, आपत्ती व्यवस्थापन विभाग व आयक्यूएसी विभागाच्या वतीने कोविड प्रतिबंधक लसीकरण शिबिर झाले.


या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल चानोदिया, तर प्रमुख पाहुणे म्हणून तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री शिंदे, वैद्यकीय अधिकारी आसमा पटेल या उपस्थित होत्या. प्राचार्य डॉ. एन. एस. राठी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. उमेश गांधी यांनी लसीकरण करून घेण्याचे आवाहन केले. संस्थेचे सचिव हेमंत पोखरणा म्हणाले, दीड वर्षापासून कोरोनामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान झाले होते. सरकारच्या प्रत्येक मोहिमेला आमच्या संस्थेचे संपूर्ण सहकार्य असते. रासेयोचे डॉ. अनारसे यांनी सूत्रसंचालन केले.

आपत्ती व्यवस्थापन विभागप्रमुख डॉ. मीरा नाथ यांनी आभार मानले. याप्रसंगी उपप्राचार्य जे. एम. भंडारी, विश्वस्त पोपटलाल भळगट, तसेच आरोग्य विभागाचे कर्मचारी व महाविद्यालयाचे प्राध्यापक व कर्मचारी या लसीकरणादरम्यान उपस्थित होते.

झुंजार नेता
दिनांक : १९ डिसेंबर २०२१

# बोद्धीक मालमत्ता अधिकार या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न

कडा दि.१८ ( वार्ताहर ):- कडा येथील श्रीअमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालय पदार्थविज्ञान विभाग आणि पेटेंट ऑफिस मुंबईयांच्या संयुक्त विद्यमाने बोद्धीक मालमत्ता अधिकार या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आभासी माध्यमाद्वारे आयोजित करण्यात आले होते. या राष्ट्रीय कार्यशाळेमध्ये देशातील दहा राज्यातून २९५ प्राध्यापक सहभागी झाले होते. कार्यशाळेचे प्रास्ताविक उपप्राचार्य व पदार्थविज्ञान विभागाचे डॉ. जवाहर भंडारी यांनी केले. ही राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित करण्याचा हेतु, केंद्रशासन पुरस्कृत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव वर्षा निमित्त देशातील संशोधकांना संशोधनासाठी प्रेरणा मिळावी त्यांनी केलेला संशोधन किती महत्वाचे व समाजासाठी उपयुक्त आहे याची समाजात जाणिव जाग्राती निर्माण व्हावी असा होता. या राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल चाणोदिया, सेक्रेटरी हेमंतकुमार पोखरणा, कोषाध्यक्ष डॉ. उमेश गांधी यांनी केले. यावेळी डॉ. संजय चाकणे डॉ. अजय ठाकूर ऑनलाइन उपस्थित होते कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नंदकुमार राठी यांनी यांनी भुषविले. उद्घाटन प्रसंगी बोलताना हेमंतकुमार पोखरणा यांनी बौद्धिक मालमत्ता अधिकार याचे महत्त्व विषद केले. डॉ उमेश गांधी यांनी याचा महाविद्यालयापासून अंगीकार कसा करता येईल याचा विचार विद्यार्थ्यांनी करावा हवा असे यावेळी बोलताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात परिषदेचे विद्या परिषदेचे सदस्य व



इंदापूर महाविद्यालयाचे प्राचार्य संजय चाकणे यांनी मूलभूत संशोधन पद्धती स्पष्ट करून त्यांचे पेटंट मध्ये रूपांतर करण्याच्या पद्धती. तसेच बौद्धिंक मालमत्ता अधिकाऱ्यांची मूलभूत, पद्धती व विनियोग याबद्दल व या अंतर्गत सात निकषांबद्दल व रोजच्या व्यवहारातील उदाहरणे देऊन संकल्पना, भारत सरकार पेटंट विभाग मुंबई चे अतिरिक्त नियंत्रक डॉ. अजय ठाकूर यांनी स्पष्ट केली. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य नंदकुमार राठी यांनी विविध उदाहरणे देऊन बौद्धिक मालमत्ता हक्क या संदर्भात उपयुक्त माहिती दिली. कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. योगेश रसाळ, प्रा. सोमनाथ हसे, प्रा. नवनाथ कराळे, प्रा. डॉ. विशाल वैद्य, प्रा. डॉ. सुदाम जाधव, प्रा. डॉ. राधाकृष्ण जोशी, प्रा. धनश्री मुनोत, डॉ. अमोल कल्याणकर , प्रा शिवाजी जगदाळे व इतरांचे सहकार्य लाभले प्रा. डॉ. योगेश रसाळ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर उपस्थितांचे आभार प्रा. नरेंद्र गवळी यांनी मानले.

# झुंजार नेता

दिनांक : २४ डिसेंबर २०२१ • वार शुक्रवार • पान ३


## गांधी महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय गणित दिन साजरा

आष्टी दि.२३ (प्रतिनिधी) - आष्टी तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालय कडा येथे दि,.२२ डिसेंबर रोजी राष्टीय गणितदिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.एस.राठी हे होते.यावेळी गणित विभाग प्रमुख डॉ.अरुणा कुलकर्णी यांनी भारताचे थोर गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन अय्यंगार यांचे मौलिक सिद्धांत सर्व जगात कसे फायद्याचे आहेत हे सांगितले. त्या म्हणाल्या रामानुजन यांच्या थिटा फंक्शन सिद्धांताचा उपयोग गणित,भौतिक शास्त्र आणि खगोल. शास्त्र या विषयांच्या समस्या सोडविण्यासाठी मोठ्या प्रमाणात केला जातो.कॅन्सरची ग्रोथ आटोक्यात आणण्यासाठी याच सिद्धांताचा उपयोग केला जातो थिटा फंक्शन ब्लॅक होल समजण्यासाठी खूप महत्त्वाचा आहे.गणित हा विषय इंटरेस्टिंग आणि क्रिएटिव पद्धतीने सोडवला तर सर्वांना त्याची आवड निर्माण होईल ही सर्व माहिती डॉ.अरुणा कुलकर्णी यांनी आयसीटी च्या माध्यमातून दिली.यानंतर प्राध्यापक नरेंद्र गवळी यांनी आपले मनोगत व्यक्त केले . कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य एन. एस.राठी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये थोर गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवन पटा विषयी माहिती दिली. मानवी जीवनात प्रत्येक गोष्टीत गणित हा विषय कसा सामावलेला आहे याविषयी वेगवेगळी उदाहरणे दिली त्यांनी या वर्षाचा रामानुजन पुरस्कार हा एका भारतीय महिलेला मिळाला याचा उल्लेख केला. गणित विषय सोपा करून शिकवण्याची जबाबदारी सर्व गणितांच्या शिक्षकाची आहे असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.मीरा नाथ यांनी केले. आभार एम.एससी.मॅथेमॅटिक्सचे विद्यार्थी किरण शिनगिरे यानी व्यक्त केले.

# झुंजार नेता

दिनांक : २८ नोव्हेंबर २०२१

LIBRARY

## कडा येथील गांधी महाविद्यालयात संविधान दिन साजरा

आष्टी :- २६ नोव्हेंबर रोजी श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे कडा
येथील गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग राज्यशास्त्र व
लोकप्रशासन विभागाच्यावतीने संविधान दिन साजरा करण्यात आला.याप्रसंगी
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. जे.एम.भंडारी हे होते.यावेळी
बोलताना डॉ.भंडारी म्हणाले की ,भारत हा खंडप्राय देश आहे नानाविविध
भाषा विविध जाती धर्म व अनेक संप्रदाय यांना एकत्रित ठेवण्याचे कार्य
भारतीय संविधानाने केले आहे. जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना
आपल्या देशाची आहे: डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संविधानाचे शिल्पकार
आहेत. काळानुरूप भारतीय राज्यघटनेत बदल झालेले आहेत.यावेळी
डॉ.श्रीकांत मगर यांनी आपले विचार व्यक्त केले. याप्रसंगी डॉ.योगेश रसाळ
यांनी संविधान उद्दीशकेचे वाचन केले.यावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजना
विभागांचे कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ.नवनाथ विधाते, डॉ.अनारसे,डॉ.तुकाराम
गोंदकर,डॉ.श्रीकांत मगर, प्रा.आशिष कटारिया, प्रा.डॉ. तळेकर,नॅक कमिटीचे
समन्वयक प्रा.नरेंद्र गवळी व डॉ.अनिल गर्जे उपस्थित होते.या कार्यक्रमाचे
प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.नवनाथ
विधाते तर आभार डॉ.तुकाराम गोंदकर यांनी मानले. यावेळी सर्व प्राध्यापक व
शिक्षकेत्तर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने
उपस्थित होते.

लोकमत
epaper.lokmat.com
औरंगाबाद, शनिवार, दि. २ ऑक्टोबर २०२१

Shri Amolak Jain Vidya Prasarak Mandal's
LIBRARY

# गांधी महाविद्यालयात हिंदी दिन साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

कडा : तालुक्यातील कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या श्रीमती एस. के. गांधी महाविद्यालयात हिंदी दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त २७ ते २९ सप्टेंबर २०२१ दरम्यान ऑनलाइन व्याख्यानमालेचे आयोजन केले होते.

उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी यांनी केले. प्रास्ताविक हिंदी विभागप्रमुख व्याख्यात्यांचा परिचय प्रा.ए.बी. डॉ. टाळके, प्रा. डॉ. तन्वीर काझी यांनी करून दिला. २७ सप्टेंबरला डॉ. गोरख काकडे यांनी 'हिंदी भाषा की सार्वत्रिकता' तर २८ सप्टेंबर रोजी डॉ. सचिन गपाट यांनी 'हिंदी का वैश्विक परिदृश्य और रोजगार की संभावना' या विषयावर व्याख्यान दिले. २९ सप्टेंबर रोजी प्रो. सुधाकर शेंडगे यांनी 'लोकल से ग्लोबल तक' या विषयावर व्याख्यान दिले.

# कडा येथील गांधी महाविद्यालयात

आष्टी दि.३ (प्रतिनिधी) - आष्टी तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालय कडा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचेवतीने राष्ट्पीता म.गांधी आणि दिवंगत पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. मदन मार्कंडे हे होते तर प्रमुख वक्ते डॉ. पांडूरंग अनारसे हे होते. यावेळी बोलताना डॉ.अनारसे म्हणाले की राष्ट्पीता म.गांधी यांनी सत्य,अहिंसा,सत्याग्राह,उपोषण व असहकार या मार्गाने देशाला स्वातंत्र्य मिळून दिले. देशाला इंग्राजांच्या पारतंत्र्यातून मुक्त केले.विद्यार्थ्यांनाही आपल्या जीवनात म.गांधी यांच्या या तत्त्वाचे अनुकरण करून आपल्या आयुष्याला आकार दिला पाहिजे. राष्ट्रीय एकात्मता,बंधूभाव आणि शांतता टिकवून ठेवून राष्ट्रहिंत जोपासले पाहिजे.यावेळी व्यासपीठावर डॉ.अनिल गर्जे,प्रा.सय्यद युनूस व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डा.नवनाथ विधाते उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्र संचलन प्रा.डा.नवनाथ विधाते यांनी केले. प्रा.सय्यद युनूस यांनी आभार मानले मानले. यावेळी सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

सकाळ बीड

, १ ऑक्टोबर २०२१

...Jain Vidya Prasarak Mandal's ... Commerce & Science College ... ARY

## हिंदी दिनानिमित्त तीनदिवसीय व्याख्यानमाला

आष्टी : तालुक्यातील कडा येथील अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे एस.के. गांधी महाविद्यालय कडा येथे हिंदी दिनानिमित्त सोमवार ते बुधवार ऑनलाइन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी यांनी केले. प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख प्रो. डॉ. विष्णू गव्हाणे तर सूत्रसंचालन डॉ. किशोर चौधरी तर आभार उपप्राचार्य डॉ ज.मो. भंडारी यांनी मानले. सोमवारी (ता.२७) डॉ.गोरख काकडे, मंगळवारी डॉ.सचिन गपाट तर बुधवारी प्रो. सुधाकर शेंडगे यांचे व्याख्यान दिले.

झुंजार नेता

दिनांक : २५ सप्टेंबर २०२१ • वार : शनिवार • पान ३

# कडा येथील गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा

आष्टी दि.२४ प्रतिनिधी) - आष्टी तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालयात काल दि.२४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने राष्ट्रीय सेवा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.योगेश रसाळ हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.अनिल गर्जे उपस्थित होते.यावेळी डॉ. गर्जे म्हणाले की,म. गांधी यांचे जन्मशताब्दी वर्ष राष्ट्रीय सेवा योजना दिन म्हणून २४ सप्टेंबर रोजी सर्वत्र साजरा केला



जातो. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी. श्रमदानाचे महत्व कळावे हा उद्देश या योजने पाठीमागे आहे.ग्रामीण भागातील लोकांमध्ये साक्षरता,बंधूभाव, राष्ट्रीय एकात्मता आणि ग्रामस्वच्छता आदी उपक्रम स्वयंसेवकामार्फत राबविले जातात.माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी. या ब्रीद वाक्यानुसार विद्यार्थी स्वयंसेवक कार्य करतात.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डा. नवनाथ विघाते यांनी केले. सुत्रसंचलन प्रा.युनूस सय्यद यांनी तर आभार डॉ.पांडूरंग अनारसे यांनी मानले. यावेळी सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

# झुंजार नेता

दिनांक : १९ सप्टेंबर २०२१ • वार: रविवार • पान ३


# शतकपूर्तीकडे वाटचाल करणाऱ्या अमोलक शिक्षण संस्थेसाठी अविनाश साबळेची कामगिरी अतुलनीय-पोखरणा

कडा, दि.१८ (प्रतिनिधी):- कडा येथील अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ ही संस्था शिक्षण क्षेत्रात अत्यंत चांगले कार्य करत असून या संस्थेची वाटचाल शतकपूर्तीकडे सुरू झाली आहे. संस्थेच्या इतिहासात माजी विद्यार्थी असणाऱ्या अविनाश साबळे यांनी जी कामगिरी केली आहे ती खरोखरच अतुलनीय आहे असे प्रतिपादन अमोलक शिक्षण संस्थेचे सचिव हेमंत पोखरणा यांनी केले.

कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ संचलित गांधी महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचा ध्वजारोहण कार्यक्रम भारताचे टोकीयो ऑलिम्पिक मध्ये प्रतिनिधित्व करणाऱ्या अविनाश साबळे या संस्थेचा माजी विद्यार्थी असणाऱ्या खेळाडू यांच्या हस्ते झाला. ध्वजारोहण नंतर झालेल्या साबळे याच्या सत्कार समारंभ कार्यक्रमात ते बोलत होते . या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल चानोदिया , संचालक डॉ. महेंद्र पटवा तसेच प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी, उपप्राचार्य डॉ. जवाहर भंडारी, प्रा. सुनील पंढरे , बी फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.निलेश जाधव , मुख्याध्यापिका नंदा राऊत , उपमुख्याध्यापक प्रा.नवनाथ पडोळे, मुख्याध्यापिका अरुणा शिंदे यांच्यासह मध्ये सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात संस्थेचे सचिव हेमंत पोखरणा यांनी ऑलम्पिक धावपटू अविनाश साबळे यांचे कौतुक करीत म्हणाले की अशा विद्यार्थ्यांचा संस्थेला सार्थ अभिमान वाटतो. श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ ही संस्था शिक्षण क्षेत्रात अत्यंत चांगले कार्य करत या संस्थेची वाटचाल शतकपूर्ती कडे झाली आहे. आत्तापर्यंतच्या संस्थेच्या इतिहासात साबळे यांनी जी कामगिरी केली आहे ती खरोखरच अतुलनीय आहे. अविनाश साबळेमुळे अमोलक शिक्षण संस्थेचे नाव जगभर चमकले. त्यांना वैयक्तिक काहीही अडचण आल्यास संस्था त्यांच्या पाठीशी उभी राहील. येत्या शैक्षणिक वर्षापासून संस्थेतून जे आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळाडू तयार होतील त्यांना ऑलिंपिकपटू अविनाश साबळे अवॉर्ड या पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल अशी घोषणा त्यांनी यावेळी केली.

कार्यक्रमाचे प्रास्तविक करताना प्रा जमीर सय्यद यांनी अविनाश साबळेचा आत्तापर्यंतचा शाळा, कॉलेजपासून जगभरापर्यंतचा प्रवासाचा आढावा घेतला . अविनाश साबळे यांनी सन २०११ मध्ये संस्थेच्या जुनियर कॉलेज मध्ये प्रवेश घेतला होता. त्यानंतर पदवी अभ्यासक्रमाकरिता त्यांनी संस्थेच्या गांधी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतला. पदवीचे शिक्षण सुरू असताना आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे त्यांनी भारतीय सेना दलात सेवा सुरू केली. श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ व सर्व विद्याशाखांमध्ये त्यांचा सत्कार करून पुरस्कार देण्यात आला. या सत्काराच्या सोहळ्यानिमित्त उत्तर देताना श्री. अविनाश साबळे फारच भारावून गेले व त्यांनी त्यांचा संस्थेतील शैक्षणिक प्रवास कसा झाला त्याचे विस्तृत वर्णन केले. त्यांना घडविणारे गुरुवर्य प्रा. जमीर सय्यद , नवनाथ पडोळे , उल्हारे , श्रीमती ज़नाबाई पवळ , पोद्दार , कडुसकर यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाल्यामुळे शेवटच्या बेंचवरून पुढील बेंचवर प्रवास झाला . त्यांच्या प्रोत्साहन आणि सहकार्य यामुळे मी आज या ठिकाणी पोहचू शकलो असे सांगितले . यापुढील पॅरिसमध्ये होणाऱ्या ऑलिंपिक स्पर्धेत सहभाग नोंदवून मी भारतासाठी, महाराष्ट्रासाठी, बीड जिल्ह्यासाठी आणि आपल्या संस्थेची मान उंचाविण्यासाठी गोल्ड मेडल हे सर्वोच्च पदक मिळवणारच असा निर्धार व्यक्त केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य जवाहर भंडारी यांनी केले तर सर्व उपस्थितांचे उपमुख्याध्यापक पडोळे यांनी आभार मानले. प्रकाश सरडे, शोभाचंद ललवाणी , मोहसीन पठाण , प्रशांत मेहेर यांनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.